phone:२८७३८४५
fax:२०२५९४६



# महाराष्ट्र शासन

पर्यावरण विभाग, मंत्रालय,

परिपत्रक क्रमांक: हवाप्र/ध्वनिप्र/१०९९/ ७२४/ प्र.क्र.५०/तां.क.३

नविन प्रशासन भवन, १५वा मजला,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

दिनांक: १६ ऑक्टोबर, २००१.

**परिपत्रक :-** सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.७२/१९९८ वर दि.२७/९/२००१ रोजी सुनावणीच्या दरम्यान दसरा-दिवाळी व इतर सणाच्या वेळी मोठ्या आवाजाचे फटाके उडविल्यामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनी व हवा प्रदूषणाचे जनतेवर होणारे संभाव्य अपायकारक परिणाम टाळण्यासाठी असे फटाके वाजविण्यावर निर्बंध घालण्याबाबत अंतरिम आदेश दिलेले आहेत. त्यानुसार,

(१) केंद्र शासन, केंद्र शासित प्रदेश आणि राज्य शासन यांनी भारत सरकारच्या राजपत्र क्र.जीएसआर- ६८२/ई, दि.५ ऑक्टोबर, १९९९ नुसार प्रकाशित केलेल्या पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत पर्यावरण (संरक्षण) नियमातील तरतुदींची मुख्यत्वेकरुन या नियमातील सुधारित नियम ८९ ची, जे फटाक्यांच्या आवाजाच्या मानकांबाबत आहेत त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. त्यानुसार,'

(अ) एखादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यन्त १२५ डेसीबल आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यांत येत आहे.

(ब) जर साखळी फटाक्यात एकूण ५०, ५० ते १०० व १०० व त्यावरील फटाके असतील तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यन्त अनुक्रमे ११५, ११० व १०५ डेसीबल एवढी असावी. यापेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या तसेच १०० पेक्षा जास्त फटाके असलेल्या सर्व साखळी फटाक्यांच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घालण्यांत येत आहे.

(२) फटाक्यांचे दारुकाम किंवा फटाके सायंकाळी ६ ते रात्री १० या कालावधी व्यतिरिक्त उडविण्यास परवानगी देण्यांत येऊ नये. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत दारुकाम व फटाके यांचा वापर करण्यांत येऊ नये.

(३) शांतता प्रभागात कोणत्याही फटाक्यांचा वापर कुठल्याही वेळेत करण्यांत येऊ नये. शांतता झोन मध्ये रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये यांच्या सभोवतालचे १०० मीटर पर्यन्तचे क्षेत्र येते.

(४) राज्याच्या शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षण संस्थांच्या व्यवस्थापक व मुख्याध्यापकांना ध्वनी व हवा प्रदूषणाचे अपायकारक परिणाम टाळण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने उचित पाऊले उचलण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

(५) सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशांना ध्वनी/हवा प्रदूषणाबाबत जनजागृती होण्याच्या दृष्टीने सर्व स्थानिक वृत्तपत्रात, दूरदर्शन, आकाशवाणी व इतर प्रसिध्दी माध्यमांच्याद्वारे प्रसिध्दी देण्यांत यावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निर्देशांचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करावे. उपरोल्लेखित मर्यादेपेक्षा जास्त आवाज करणारे फटाके/साखळी फटाके जप्त करुन त्यांची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यांत यावी.

१६/१०/०१
(विनय मोहन लाल)
प्रधान सचिव (पर्यावरण)

प्रत,
प्रधान सचिव, गृह विभाग
प्रधान सचिव, शालेय शिक्षण/उच्च व तंत्रशिक्षण विभाग
प्रधान सचिव, नगर विकास विभाग
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय
सर्व जिल्हाधिकारी
सर्व महापालिका आयुक्त
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
सर्व पोलीस आयुक्त / उपआयुक्त जिल्हा पोलीस अधिक्षक
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.